# किशोरकुमार - भाग ५



थोडक्यात म्हणजे यानंतरची वर्षे किशोरकुमारसाठी फारच चांगली होती. पण एक उणीव मात्र कायमचीच राहून गेली. ती म्हणजे या गायकाकडे असामान्य प्रतिभा असूनही नौशाद यांनी त्याच्यासाठी एकही गाणे तयार केले नाही. त्याच्याखेरीज त्या वेळच्या प्रत्येक गायकाकडून नौशाद यांनी गाणी म्हणून घेतली आणि ह्यालाच का अपवाद ठरवले कळत नाही. महेन्द्र कपूर, मन्ना डे, तलत, मुकेश, सुरेन्द्र, रफी, हेमंत, श्याम, इ. गायकांसाठी या संगीतकाराने गाणी रचली. परंतु नौशादनी पुढे १९७५ साली प्रदर्शित झालेल्या 'सुनेहरा संसार' मधील 'हॅलो, हॅलो, क्या हाल है? बडा बुरा ये साल है' हे द्वंद्वगीत आशासोबत किशोरकडून गाऊन घेतले आणि त्याच्यावर झालेला अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैव असे की ध्वनीमुद्रित झालेल्या या गाण्याचा चित्रपटात समावेशच झाला नाही. परंतु १९७५ साली किशोरच्या आयुष्यात केवळ ही एकच वाईट गोष्ट झाली असे नव्हे, तर त्याच वर्षी त्याचे माहिती आणि दूरसंचार खात्याबरोबर भांडण झाले.

जून १९७५ मध्ये देशात आणीबाणी पुकारण्यात आली. संजय गांधीच्या आदेशानुसार शासनातील काही लोकांनी त्याला पक्षाच्या बळकटीसाठी होणाऱ्या संमेलनातून बिदागी न घेता ('देशासाठी') गाण्यास सांगितले. त्याने त्यास नकार दिला. त्यावर त्यांनी काय केले असेल ? त्यांनी त्या दिवसांत आकाशवाणी आणि दूरचित्रवाणीवरून प्रसारित होणाऱ्या गाण्यांतील किशोरकुमारची सर्व गाणी ब्लॅक लिस्टमध्ये टाकली. त्याची कुठलीही गाणी तिथे लागत नव्हती. तरीही दिवसागणिक तो लोकांमध्ये अधिकाधिक प्रिय होत चालला होता. ह्याचे कारण म्हणजे त्याचे गाणे, नाचणे आणि अभिनय लोकांच्या हृदयाला थेट भिडत होते आणि तेच तर लोकप्रियतेचे खरे रहस्य आहे !

ज्याने कधी गाण्याची स्वरलिपीही वाचण्याची तसदी घेतली नाही अशा किशोरकुमारने चित्रपटांतून अंदाजे १६०० गाणी गायली ही गोष्ट केव्हाही प्रशंसनीयच आहे. कॅमेराच्या पुढे रंगरंगोटी करून येणे ज्याला आवडत नसे अशा माणसाने अभिनेता म्हणून ९५ चित्रपटांत काम केले हे म्हणजे खूपच झाले ! त्याने नायक म्हणून मधुबालाबरोबर ७, वैजयंतीमाला व कुमकुमबरोबर प्रत्येकी ६, मीनाकुमारी बरोबर ५ आणि कल्पना, मुमताझ, माला सिन्हा, नूतन, तनुजा इ. बरोबर प्रत्येकी काही चित्रपटांतून भूमिका केल्या.

१९६१ सालच्या 'झुमरू' चित्रपटापासून तो संगीत दिग्दर्शक म्हणून पुढे आला. त्याने पुढील चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले: 'झुमरू', 'दूर गगन की छाँव मे', 'दूर का राही', 'जमीन आस्मान', 'बढती का नाम दाढी', 'शाब्बाश डॅडी', 'चलती का नाम जिंदगी' व 'दूर वादियों मे' - ह्या १९८२ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटात एकही गाणे नव्हते (फक्त पक्षांचा, वाऱ्याचा, प्रवाहाचा, इ. आवाज होते). त्याचा शेवटचा चित्रपट 'ममता की छाँव मे' हा त्याच्या मृत्यूनंतर, १९९९० मध्ये प्रदर्शित झाला.

१३ ऑक्टोबर, १९८७ रोजी किशोरकुमारचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. तो अशोककुमार यांचा वाढदिवस होता. ज्या वडील भावाबद्दल किशोरकुमारला अतीव आदर व जिव्हाळा होता त्या अशोककुमारना वाढदिवशी  ही क्रूर भेट मिळाली. परंतु मृत्यूपुढे कुणाचेच काहीच चालत नाही, मग ते गाणे असो वा वाढदिवस !

किशोरकुमारला खांडवा या स्वत:च्या जन्मगावाबद्दल अतिशय ओढ असल्यामुळे त्याच्या मुलाने - अमितकुमारने किशोरकुमारचा पार्थिव देह खांडव्याला अंतिम भेटीसाठी नेला.

(समाप्त)

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.